दैनिक युवाराष्ट्र दर्शन
यवतमाळ
बुधवार, २८ जानेवारी २०२६
जिल्हा



## पात्र व्यक्तींनी अर्ज करण्याचे आवाहन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २७ जानेवारी**

अत्याचारग्रस्त बालकांना मदत करण्यासाठी सहाय्यक व्यक्तींची गरज असून, इच्छूकांनी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्याकडून करण्यात आले आहे. पॉक्सो कायदा, २०१२ अंतर्गत बालकांना भावनिक आणि मानसिक आधार प्रदान करण्यासाठी सहाय्यक व्यक्तींची नियुक्ती केली जाईल. समाजकार्य, समाजशास्त्र, मानसशास्त्र, बाल विकास या विषयात पदव्युत्तर पदवी, बाल हक्क किंवा बाल संरक्षणाच्या क्षेत्रात ३ वर्षाचा अनुभव तसेच बालगृह किंवा निवारागृहाशी संबंधित अधिकारी देखील सहाय्यक व्यक्ती म्हणून अर्ज करण्यास पात्र असु शकतात. अर्ज जिल्हा बाल संरक्षण कक्ष, २ रा मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, यवतमाळ येथे स्विकारल्या जातील. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. अर्ज करण्याची शेवटचीअर्जाची शेवटची तारीख ३१ जानेवारी 2026 राहील. असे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजूरकर यांनी कळविले आहे.

## घाटंजी तहसिलदार यांचा मनमानी कारभार



### अपुर्ण बांधकाम ईमारतीत कार्यक्रम घेण्याचा अट्टाहास कुणाचा?

**•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधि - शेखर पलकंडवार, दि. २७**

घाटंजी-दरवर्षी खुल्या जागेत होणारा २६ जानेवारीचा सांस्कृतिक कार्यक्रम अपुर्ण बांधकाम असलेल्या नवीन इमारतीच्या तहसिल कार्यालय चे अपु-या जागेत घेण्यात आला.ज्या इमारतीचे बांधकाम काम अपूर्ण अवस्थेत असून इमारत अद्याप हस्तांतरित झाली नाही. शिवाय या कार्यक्रम स्थळी जाण्यासाठी योग्य मार्ग ही नाही. प्रशस्त स्टेज जागा नसल्याने सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी सहभागी विद्यार्थी पालक यांना परत जावे लागले आहे. अक्षरशा: कोंडवाडा सारखी परिस्थिती असल्याचे चित्र कार्यक्रम स्थळी दिसून येत होते. ही परिस्थिती पाहून पालकांच्या संतप्त प्रतिक्रिया येत होत्या. तसेच कार्यक्रम करण्याकरिता विद्यार्थी व पालकांना गिट्टी रेतीच्या ढिगाऱ्यावर तयारी करावी लागत असल्याचे चित्र पहायला मिळाले. तसेच लघुशंका करण्यासाठी पण कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने महिलाही संतप्त झाल्या होत्या. स्पर्धकांचे पालक व शिक्षक, शिक्षीका सह 70% प्रेक्षकांना बाहेर थांबावे लागल्याने कार्यक्रमाचा पुर्णत: फज्जा उडालेला दिसून आला. एकीकडे हस्तांतरित न झालेल्या इमारतीत कार्यक्रम घेऊन विद्यार्थी व पालकांच्या जीवाशी खेळ केला अशी संतप्त प्रतिक्रिया पालकांनी बोलून दाखवली.तहसील प्रांगणात प्रशस्त जागा असताना निर्माणधीन इमारतीत कार्यक्रम घेण्याचा अट्टाहास का? या विषयावर सार्वजनिक विभागाशी संपर्क केला असता आम्हाला पत्र प्राप्त झाले मात्र आम्ही कार्यक्रमाकरिता कोणतीही परवानगी दिली नसल्याचे सांगितले. तसेच निवासी नायब तहसीलदार यांना विचारणा केली असता हा निर्णय समितीने घेतला त्यामुळे तुम्ही वरिष्ठ अधिकारी यांना विचारा असे सांगितले.

## संक्षिप्त

### चंद्रकांताबाई जाजू यांचे निधन



यवतमाळ : चंद्रकांताबाई जगदीशचंद्र जाजू (वय ८०, रा. नेहरूनगर, यवतमाळ) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर येथील पांढरकवडा रोडवरील मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती जगदीशचंद्र, मुले संजय, अजय, राजेश, मुली सविता, संगीता, स्नुषा जयश्री, सपना, नातवंड व आप्त परिवार आहे.

### रजनी किन्हीकर यांचे निधन



यवतमाळ : रजनी रमेशराव किन्हीकर (वय ७८) रा. समर्थवाडी यांचे सोमवारी दिनांक २६ जानेवारी रोजी रात्री 1 वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पांढरकवडा मार्गावरील मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले आणि चार सूना, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

### घरफोडीत दोन लाखांचा ऐवज लंपास

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ :** येथील अवधुतवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत भोसा रोडवरील एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने २,०४,८७४ रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. फिर्यादी मोहम्मद युसुफ शेख हसन (५१) हे आपल्या कुटुंबासह लग्नासाठी बाहेरगावी गेले असता ही घटना घडली. चोरट्याने घराचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला आणि कपाटातील १,५०,००० रुपये नगदी व ५४,८७४ रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना २५ जानेवारीच्या रात्री घडली असून, २६ जानेवारी रोजी अवधुतवाडी पोलीस ठाण्यात याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणावर भर

## पालकमंत्री संजय राठोड : पालकमंत्री यांच्या हस्ते ७७ व्या प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २७ जानेवारी**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन आज स्थानिक समता मैदान येथे साजरा करण्यात आला. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. यावेळी जिल्ह्याच्या विकासाचा आढावा घेताना पालकमंत्र्यांनी सिंचन, कृषी, महिला सक्षमीकरण आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणावर भर दिला.



या सोहळ्याला जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) डॉ. किशोर मानकर, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांनी परेडचे निरीक्षण केले आणि पोलीस दलाने मानवंदना दिली. याप्रसंगी उपस्थित सर्व नागरिक आणि विद्यार्थ्यांना 'बालविवाह प्रतिबंधक शपथ' देण्यात आली. सामाजिक कुप्रथा दूर करून सुदृढ समाज घडवण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूरवीरांच्या स्मृतींना उजाळा देत, कार्यक्रमात वीरमाता व वीरपत्नींचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था, आदर्श कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

### १.९५ लाख महिलांना लखपती दीदी बनविणार

**पालकमंत्री आपल्या भाषणात म्हणाले की, "यवतमाळ जिल्हा आज तंत्रज्ञान, कृषी आणि सिंचन क्षेत्रात मोठी झेप घेत आहे. बेंबळा प्रकल्प आणि निम्न पैनगंगा प्रकल्पामुळे जिल्ह्याचे नंदनवन होईल. १.९५ लाख महिलांना 'लखपती दीदी' बनवून आपण महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श ठेवला आहे." तसेच 'मिशन उभारी' आणि 'योजना पोर्टल'च्या यशाबद्दल त्यांनी प्रशासनाचे कौतुक केले.**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यात घरांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. येत्या १ मे रोजी महाराष्ट्र दिनी लाभार्थ्यांचा भव्य गृहप्रवेश सोहळा साजरा करण्यासाठी 'येत्या १ मे, महाराष्ट्र दिनी आपल्या घरी' या विशेष फलकाचे अनावरण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. २६ जानेवारी ते १ मे या कालावधीत १ लाख घरे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे.

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आणि प्रशासकीय सेवा अधिक सक्षम करण्यासाठी पालकमंत्री संजय राठोड यांच्या प्रेरणेतून व जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या पुढाकारातून एकूण ६२ वाहने मंजूर झाली आहेत. त्यापैकी प्राप्त झालेल्या २४ अत्याधुनिक वाहनांचे लोकार्पण पालकमंत्र्यांनी हिरवी झेंडी दाखवून केले.

## आर्णीतील मूस्लिम कब्रस्थान व हिन्दु स्माशानभूमीत रस्ता,वॉल कम्पाऊंड सौदर्यीकरण करण्याची मागणी

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ / आर्णी, दि. २७ जानेवारी**

आर्णीतील बोरगाव दाभडी रोडवरील मूस्लिम कब्रस्थान व हिन्दु स्माशानभूमीत जाण्याचा रस्ता, वॉल कम्पाऊंड व सौदर्यीकरण करण्यात यावे अशी मागणी शिवसेना महिला आघाडी तालूका प्रमूख तथा शिवउद्योग संघटना यवतमाळ जिल्हा प्रमूख अश्वीनी देशमूख यांनी नगर परिषदचे मूख्यधिकारी, नगराध्यक्ष यांना निवेदनाव्दारे केली आहे.



आर्णी येथील दाभडी बोरगाव रोडवरील मूस्लिम कब्रस्थान व हिन्दु स्माशानभूमी आहे. येथे जाण्यासाठी रस्ता नाही, वॉल कम्पाऊंड नाही घाणीचे साम्राज्य परसले आहे यामूळे आर्णी येथील दाभडी बोरगाव रोडवरील मूस्लिम कब्रस्थान व हिन्दु स्माशानभूमी आर्णी नगर परिषद हद्दीत असून आपल्या नगर परिषदला कब्रस्थान व स्माशानभूमी साठी विशेष निधी असतो त्या विशेष निधी व नगर परीषद निधी अंतर्गत रस्ता,वॉल कम्पाऊट व सौंदर्यीकरण करण्यात यावे अशी मागणी आज ता. 27 जानेवारीला शिवसेना महिला आघाडी तालूका प्रमूख तथा शिवउद्योग संघटना यवतमाळ जिल्हा प्रमूख अश्विनी देशमूख यांनी नगर परीषद मूख्यधिकारी रविंद्र राऊत, नगराध्यक्ष नालंदा भरणे यांना निवेदनातून केली असून निवेदन देतेवेळी शिवसेना महिला आघाडी तालूका प्रमूख, तथा शिवउद्योग संघटना जिल्हा प्रमूख अश्विनी देशमूख, संध्या मुनेश्वर शहर प्रमुख, कविता चव्हाण ऊपशहर प्रमूख, कविता मोरे संघटक, अभिलाष इंगोले शिवसेना विधानसभा अध्यक्ष, मुस्ताक जब्बार शेख अल्पसंख्या शहर प्रमुख, सागर मेश्राम विभाग प्रमुख, इमरान अय्युब खान, मुजाहिद दिलावर खान, हुजेफा रउप शेख, मुदस्सर मातीन खान, यासीन मामू शेख सलमान खान, रशीद खान आदीजण उपस्थित होते.

## ज्येष्ठ पत्रकार संभा मडावी यांना आदिवासी समाज भुषण पुरस्कार

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पांढरकवडा, दि. २७ जानेवारी**

येथील 'दैनिक युवाराष्ट्र दर्शन'चे प्रतिनिधी तथा सामाजिक कार्यकर्ता भिमगीत गायक संभा मडावी यांना आयोजित प्रजासत्ताक दिनानिमित्त गीत गायनाच्या कार्यक्रमात त्यांचा स्मृतिचिन्ह देवुन सन्मान करण्यात आला. सदर कार्यक्रम येथील बचत भवन हॉल नगर परिषद येथे झाला.



या कार्यक्रमाचे आयोजन प्रेस क्लब पांढरकवडा तथा आदिवासी समाज मित्र परिवार पांढरकवडा यांनी केले होते. या ठिकाणी फिल्म गित, भावगित, भिमगीत भक्तीगित मोठ्या उत्साहाने पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर परिषदचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतिष उर्फ सोनु बोरेले होते तर उद्घाटक म्हणून रॉबिन बन्सल उप-विभागिय पोलिस अधिकारी तर प्रमुख अतिथी शंतणु दुधाडे कार्यकारी अभियंता सां.बा. विभाग पांढरकवडा, वैशाली सातुरवार वैद्यकिय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय पांढरकवडा, लहुजी तावरे पोलिस निरिक्षक पांढरकवडा, प्रविण पिन्नयवार व रघुनाथ सिडाम मार्थाजुनकर हे मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमात संभा भडावी, प्रज्ञा रामटेके (कुंभारे), अरुण नरांजे, छाया पुराणिक, सुधिर मडावी, सिध्दार्थ कांबळे, अजय शामकुवर, चंदा नरांजे, प्रविण कनाके यांची गाणे झालित कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी प्रेस कल्ब पांढरकवडा तथा आदिवासी समाज मित्र परिवार अथक परिश्रम घेतले विषेश सहकार्य वन विभागाचे क्षेत्ररक्षक अधिकारी जिवन मेश्राम व त्यांची टिमने केले.

## आ.बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते तेली समाजातील नगर सेवकांचा सत्कार

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २७ जानेवारी**

जिल्ह्यातील तेली समाजाचे १ नगराध्यक्ष नेर व १८ नगरसेवक निवडून आले तर २नगरसेवक स्वीकृत नगरसेवक वणी येथील रवी बेलूरकर तर नेर येथून रुपेश गुल्हाने यांना नगरपरिषदेत घेतल्या गेले. संताजी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित रजि.नं ३९८ व अखिल तेली समाज महासंघाच्या वतीने दिनांक २५ जानेवारीला हॉटेल उडुपी दत्त चौक यवतमाळ येथे नवनिर्वाचित नगरसेवक उपाध्यक्ष नगरसेवकाचा सत्कार आमदार बाळासाहेब मांगूळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संताजी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वल करुन प्रमुख अतिथी देवराव जीपकाटे अभियंता, अविनाश राजगुरे



नगरसेवक इत्यादीच्या उपस्थितीत करण्यात आला. १५ नगरसेवक उपस्थित असतांना त्यांचा शाल श्रीफळ मुमेंटो देवून सत्कार करण्यात आला. सदर सत्कार यवतमाळ येथील सौ.प्रियंका चेतन भवरे शिक्षक सभापती, साधना विनोद काळे स्थायी समिती सदस्य, नेर येथील उपाध्यक्ष सौ.शिवानीताई गुगलिया, सौ. रिनाताई गुल्हाने सौ.स्वातीताई गुल्हाने, शालिकराव गुल्हाने, प्रवीण जयस्वाल, रुपेश गुल्हाने दारव्हा येथील रोनीत हरिभाऊ गुल्हाने, दिग्रस येथील सौ. स्वातीताई दिनेश धाडवे, पुसद येथील अक्षय संजय महाकाळ, वणी येथील उषाताई डुकरे, रवी बेलूरकर, पांढरकवडा येथील उपाध्यक्ष आतिष तानाजी चव्हाण इत्यादीचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला सदर सत्काराला १५ ही नगरसेवक समाज बांधवानी आपल्या सत्काराला उत्तर दिले.

### प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रजासत्ताक दिन

**•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य केंद्रात 26 जानेवारी प्रजासत्ताक दिन विविध सामाजिक व आरोग्य जनजागृती उपक्रमांसह उत्साहात साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका आणि नागरिकांनी तंबाखूमुक्तीची शपथ घेत समाजात व्यसनमुक्तीचा संदेश दिला. कार्यक्रमादरम्यान नवनिर्वाचित नगराध्यक्षा, तसेच नगरसेवकांचा सत्कार प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ. स्वाती मुनेश्वर यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष अर्चनाताई कांता वासमवार यांचा सत्कार व नवनिर्वाचित नगरसेवक यांनाही शुभेच्छा दिल्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी पदाधिकारी यांनी कार्यक्रमाला उपस्थित होते.

## मंत्री मंडळातून गिरीश महाजन यांच्या हकालपट्टीसाठी वंचित आक्रमक

**•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी महागाव, दि. २७ जानेवारी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण सोहळ्यात भाषण करतांना जलसंपदा मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख टाळून त्यांचा अपमान केल्याचा आरोप 'वंचित बहुजन आघाडी'ने केला आहे. या प्रकरणाचा जाहीर निषेध करत महाजन यांच्यावर 'ॲट्रॉसिटी ॲक्ट'नुसार गुन्हा दाखल करून त्यांची मंत्रीपदावरून तात्काळ हकालपट्टी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



२६ जानेवारी २०२६ रोजी नाशिक येथील प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित शासकीय कार्यक्रमात ध्वजारोहण प्रसंगी पालकमंत्री गिरीश महाजन यांनी भाषण केले. या भाषणात त्यांनी जाणूनबुजून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेणे टाळले, असा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. हा प्रकार केवळ महापुरुषांचा अपमान नसून संविधानाचा अवमान असल्याची देशभरातील आंबेडकरी जनतेची भावना असुन महाजन यांच्यावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवावा, संविधानाचा अपमान करणाऱ्या व्यक्तीला मंत्रीपदावर राहण्याचा अधिकार नाही, त्यामुळे त्यांना पदावरून तात्काळ दूर करावे. अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात येवुन महाजन यांच्या मानसिकतेचा आणि वक्तव्याचा 'वंचित'च्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. "१५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारी १९५० ला संविधान अमलात आले. या संविधानामुळेच देश एकसंध आहे. अशा पवित्र दिवशी संविधानाच्या शिल्पकाराचे नाव न घेणे हे त्यांच्या 'मनुवादी' मानसिकतेचे प्रतीक आहे," असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीचे महागाव तालुका अध्यक्ष अंकुश प्रभाकर कोकरे यांच्या नेतृत्वात हे निवेदन तहसीलदार महागाव यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवण्यात आले आहे. मंत्री महाजन यांच्यावर योग्य कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## प्रेस वेलफेअरचा करंडक सलग चवथ्यांदा स्वर्णलीलाने पटकाविला

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी वणी, दि. २७ जानेवारी**

प्रेस वेलफेअर असोशिएशन द्वारा आयोजीत आंतर शालेय समुह नृत्य स्पर्धेचा करंडक याहीवर्षी स्वर्णलीला इंटरनॅशनल स्कुलने पटकाविला. सलग चवथ्या वर्षी स्वर्णलीला स्कूलने ही कामगीरी केली.



प्रेस वेलफेअर असोशिएशन प्रजासत्ताक दिनाचे दिवशी दरवर्षी ही स्पर्धा आयोजीत करते. शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या स्पर्धेत २० शाळांच्या चमुंनी बहारदार नृत्य सादर केली. स्पर्धेचे उद्‌घाटन माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार व ठाणेदार गोपाल उंबरकर, अध्यक्ष अनिल बिलोरीया यांचे उपस्थितीत, नगराध्यक्ष विद्या सचिन आत्राम यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन कोषाध्यक्ष तुषार अतकारे व गजानन कासावार यांनी केले.पूर्व माध्यमिक गटात प्रथम क्रमांक शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालयाने ,द्वितीय क्रमांक संताजी इंग्लीश मिडियम स्कुलने, तृतीय क्रमांक जनता विद्यालयाने, तर प्रोत्साहनपर बक्षिस नगर परिषद शाळा क्रमांक सातने मिळविले. माध्यमिक गटात प्रथम क्रमाक स्वर्णलीला इंटरनॅशनल स्कूलने, द्वितीय क्रमांक विवेकानंद विद्यालयाने, तृतीय क्रमांक वणी पब्लीक स्कुलने, प्रोत्साहनपर बक्षीस शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालयाने पटकाविले. दिव्यांग गटात रामदेवबाबा मुक बधिर विद्यालय या शाळेच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करून वाहवाह मिळविली.स्पर्धेदरम्यान विजय चोरडिया,संजय खाडे, किरण दिकुंडवार , विजय महाले,संजय निमकर, ,निकेत गुप्ता,दिपक मत्ते, डॉ गणेश लिमजे यांचा प्रेस वेल्फेअरतर्फे सत्कार करण्यात आला. तसेच रवि बेलुरकर यांची नगरपरिषदेच्या स्विकृत सदस्यपदी निवड झाल्याबदल असोशिएशनतर्फे सत्कार करण्यात आला. आमदार संजय देरकर,शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव अशोक सोनटक्के यांचे हस्ते बक्षिस वितरण पार पडले. स्पर्धेचे परीक्षण प्राचार्य हेमंत चौधरी व नृत्य दिग्दर्शिका आस्था दहेकर यांनी केले.विनोद ताजने यांनी आभार प्रदर्शन केले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी सचिव सागर बोढे, ,उपाध्यक्ष रमेश तांबे,सहसचिव जीतेन्द्र डाबरे, किशोर चवने,मंगल तेलंग,सुरज चाटे,बंडू निंदेकर,पुरुषोत्तम नवघरे,लोकेश गुंडलवार,सुनील पाटील, रज्जाक पठाण, महादेव दोडके यांनी परीश्रम घेतले.फीरता करंडक स्व ऋषी पिदूरकर यांचे स्मृती प्रित्यर्थ योगेश पिदूरकर यांनी तर पूर्व माध्यमिक व माध्यमिक गटातील विजेत्या शाळांना चषक स्व.बाळूभाऊ धानोरकर यांचे स्मृती प्रीत्यर्थ खासदार प्रतीभा धानोरकर यांचेतर्फे प्रायोजित करण्यात आली होती

## एम एम कॉलेज येथे तालुकास्तरीय टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे उद्घाटन संपन्न

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दारव्हा, दि. २७ जानेवारी**

सहकार महर्षी तथा माजी आमदार लोकनेते बाळासाहेब घुईखेडकर फाउंडेशन, यवतमाळ, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या संयुक्त विद्यमाने आज दि.२७ जानेवारी २०२६ ला तालुका स्तरीय टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर अध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ दारव्हा, उद्घाटक शिवप्रसाद मुळे पोलीस निरीक्षक दारव्हा तर प्रमुख अतिथी म्हणून विराज घुईखेडकर सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती बोरी (अरब), नानाभाऊ गाडबैले, सलीम सोलंकी, नानाभाऊ राऊत, किशोर चारोळे, प्रा.चरण पवार, प्रा. सुभाष गावंडे, प्राचार्य डॉ. सुनील चकवे, माजी प्राचार्य डॉ.विलास राऊत, रणजित झोंबाडे, ईश्वर राठोड आणि रामदास राऊत याची उपस्थिती होती.



आपल्या अध्यक्षीय मनोगतातून वसंतराव घुईखेडकर यांनी जीवनात खेळाचे महत्त्व काय आहे हे सांगत आपण स्वत: नियमित सकाळी टेबल टेनिस खेळायला जातो असे नमूद करून सर्व क्रिकेट संघाच्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. विराज घुईखेडकर यांनी सहकार महर्षी स्व.बाळासाहेब घुईखेडकर फाउंडेशन यवतमाळ च्या वतीने भविष्यात जिल्हा व राज्य स्तरीय क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्याचे मानस आहे असे सांगितले.

सामन्यांच्या आयोजनात शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा.सुनील डंभारे यांनी महत्वाची भूमिका बजावली.

युवाराष्ट्र दर्शन
भंडारा
जिल्हा
बुधवार दि.२८ जानेवारी २०२६

## महात्मा ज्योतीबा फुले मार्केटमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** शहरातील महात्मा ज्योतिबा फुले मार्केटमध्ये दि.२६ जानेवारी रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन भंडारा नगरसेवक शिवशंकर आजबले यांच्या हस्ते भंडारा नगरसेविका सुनीताताई उपरीकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणुन नगरसेवक नितीन गायधने, शैलेश मेश्राम, अविनाश ब्राह्मणकर, अजय ब्राह्मणकर, महात्मा ज्योतिबा फुले मार्केटचे अध्यक्ष महेंद्र मेंढे, जितेंद्र ढेंगे, नागेश ताइतकर,शेखर बाईक, शोबिर भाई,सुरेश साखरकर, सुरेश गायधने तसेच महात्मा ज्योतिबा फुले मार्केटचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# किरकोळ वादातून पत्नीचा पतीवर चाकूहल्ला





**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**नाकाडोंगरी:** चित्रपट पाहताना मित्राच्या शेजारी का बसला, या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हिंसक घटनेत झाले. नाकाडोंगरी येथे एका पत्नीने आपल्या पतीवर चाकूने हल्ला करून त्याला जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी गोवरवाही पोलिसांनी आरोपी पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार आशिष शंकर मिश्रा (वय ३९, रा. नाकाडोंगरी) हे २६ जानेवारी रोजी दुपारी पत्नी व मुलगी आणि दोन मित्र-ांसह तुमसर येथे चित्रपट पाहण्यासाठी गेले होते. चित्रपटगृहात आशिष हे आपल्या मित्राच्या शेजारी बसल्याने त्यांची पत्नी संतापली होती. या कारणावरून दोघांमध्ये चित्रपटगृहाबाहेर आणि घरी परततानाही जोरदार शाब्दिक चकमक झाली.

**चाकूने केला वार**

सोमवारी रात्री १०:३० वाजेच्या सुमारास आशिष घरी कपडे बदलत असताना पत्नी ने पुन्हा जुन्या वादावरून त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने रागाच्या भरात पत्नी ने स्वयंपाकघरातील भाजी कापण्याचा चाकू आणला आणि आशिष यांच्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. आशिष यांनी स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला असता, चाकू त्यांच्या डाव्या हाताच्या कोपराला लागला, ज्यामुळे ते गंभीर जखमी झाले. तसेच त्यांच्या गळ्यावर ओरखडे ओढून त्यांना मारहाण करण्यात आली.

**पोलीस कारवाई**

या घटनेनंतर आशिष मिश्रा यांनी गोवरवाही पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी याप्रकरणी आरोपी पत्नी हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इठर), २०२३ च्या कलम ११८(१) (धोकादायक शस्त्राने दुखापत करणे), ३५२ (शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान) आणि ३५१(२) (गुन्हेगारी धमकी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल लंकेश्वर रघुर्ते करत आहेत.

# प्रकल्पग्रस्तांनी रोखला राष्ट्रीय महामार्ग

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांकडे शासन सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याने न्यायहक्कांसाठी २६ जानेवारी रोजी प्रकल्पग्रस्तांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. आंदोलन करुनही कोणतीही दखल न घेतल्याने प्रकल्पग्रस्तांनी राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर करुन प्रकल्पग्रस्तांवर लाठीचार्ज केला. अखेरीस अधिकाऱ्यांनी आश्वासनाचे पत्र दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. गणतंत्रदिनी दिवसभर सुरू असलेल्या या आंदोलनामुळे प्रशासनाच्या नाकीनऊ आले होते.



गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या पूनर्वसनाचे अनेक प्रश्न दशकांपासून रेंगाळलेले आहेत. यामध्ये वाढीव मोबदला, गावठाणांमधील नागरी सुविधा व इतर प्रलंबित मागण्यांचा समावेश आहे. धरणाच्या बॅकवॉटरमुळे अनेक गावे प्रभावित झाले आहेत. परंतु, त्यांना प्रकल्पग्रस्तांचा दर्जा नाही. त्यामुळे ही गावे लाभापासून वंचित आहेत.

गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांनी कारधा येथील वैनगंगा नदीच्या पात्रात जलसमाधी आंदोलन सुरू केले होते. त्यावेळी पालकमंत्र्यांनी दूरध्वनीवरून आंदोलकांशी संवाद साधला आणि विधिमंडळ अधिवेशनानंतर पुढील आठवड्यात समिती सदस्यांसोबत निर्णायक बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, बराच काळ लोटूनही कोणतीही बैठक न झाल्याने अखेरीस २६ जानेवारी रोजी राष्ट्रीय महामार्गावरील पिपरी पूनर्वसन येथील पाण्याच्या टाकीवर प्रकल्पग्रस्त चढून भाऊ कातोरे, अभिजित लेंडे, दिलीप मडामे या प्रकल्पग्रस्तांनी आंदोलन सुरू केले.

सोबतच शेकडो प्रकल्पग्रस्तांनी राष्ट्रीय महामार्ग अडवून ठेवला. जोपर्यंत पालकमंत्री येऊन बैठक घेत नाही तोपर्यंत आंदोलन सुरुच ठेवण्याचा पवित्रा प्रकल्पग्रस्तांनी घेतल्याने प्रशासन खळबळून जागे झाले. प्रशासकीय अधिकारी आणि पोलिसांचा मोठा ताबा आंदोलनस्थळी आला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर केल्याने परिस्थिती अधिकच चिघळली.

खा. प्रशांत पडोळे यांनी आंदोलनस्थळी येत प्रकल्पग्रस्तांना समर्थन दिले. त्यांनी प्रकल्पग्रस्तांवर लाठीहल्ला करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना माफी मागण्यास सांगितले. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांची माफी मागितली. गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त समितीच्या पदाधिकाऱ्या सोबत जलसंपदा विभागाच्या मुख्य सचिवांकडून चर्चा करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

### पालकमंत्र्यांना नाही वेळ

जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांनी यापूर्वी बैठकीचे आश्वासन दिले होते. परंतु, आश्वासन देऊनही त्यांनी बैठक घेतली नाही. 'पालकमंत्री जनता दरबारा'चे आयोजन करुन जनतेच्या तक्रारी सोडविणाऱ्या पालकमंत्र्यांना प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या ऐकून घेण्यासाठी वेळ नाही का? असा प्रश्न प्रकल्पग्रस्तांनी उपस्थित केला.

# पाच दिवस कामाच्या आठवड्यासाठी बँक कर्मचाऱ्यांचे आंदोलन

### UFBU च्या देशव्यापी संपाला भंडाऱ्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स (UFBU) यांच्या वतीने पाच दिवसांचा कामाचा आठवडा लागू करण्याच्या मागणीसाठी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर आज भंडारा येथे स्टेट बँक ऑफ इंडिया मुख्य शाखेसमोर बँक कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने केली.




या आंदोलनात विविध राष्ट्रीयीकृत बँकांमधील कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी आंदोलनकर्त्यांनी 'पाच-दिवसीय बँकिंग आमचा हक्क आहे', 'बँक कर्मचाऱ्यांचे शोषण थांबवा', 'आमच्या आरोग्य, कुटुंब आणि सन्मानासाठी पाच-दिवसीय बँकिंग आवश्यक आहे' अशा घोषणा देत सरकारविरोधात आपला तीव्र रोष व्यक्त केला.

बँक कर्मचाऱ्यांचे वाढते कामाचे तास, कामाचा प्रचंड ताणतणाव, कुटुंबासाठी पुरेसा वेळ न मिळणे तसेच खालावत चाललेली जीवनमानाची गुणवत्ता या गंभीर समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. पाच दिवसांचा कामाचा आठवडा ही कोणतीही सुविधा नसून बँक कर्मचाऱ्यांचा मूलभूत हक्क असल्याचे आंदोलनकर्त्यांनी ठामपणे सांगितले.

आज दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी UFBU भंडारा युनिटच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात स्टेट बँक ऑफ इंडिया स्टाफ युनियन, नागपूर मॉड्यूलचे उपाध्यक्ष सचिन वहिले, गोंदिया रिजनचे रिजनल सेक्रेटरी अभय शहारे यांनी मार्गदर्शन केले.

UFBU ही नऊ प्रमुख बँक युनियन्सची संयुक्त संघटना असून, त्यांनी दीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या पाच दिवसांच्या कामाच्या आठवड्याच्या मागणीसाठी हा संप पुकारला आहे. कर्मचाऱ्यांनी सांगितले की, २०१५ मध्ये दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सुट्टी देण्याचे मान्य झाले होते. त्यानंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये, दररोज ४० मिनिटे कामाचे तास वाढवून सर्व शनिवारी सुट्टी देण्याचा प्रस्ताव IBA ने सरकारकडे पाठवला होता. मात्र, हा प्रस्ताव गेल्या दोन वर्षांपासून सरकारकडे प्रलंबित असून त्याविरोधातच हा देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे.

सरकारने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे तात्काळ गांभीर्याने लक्ष द्यावे व पाच दिवसांचा कामाचा आठवडा लागू करावा, अन्यथा हा लढा अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. सदर आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

# 'व्हॉट्सअॅप बाबा' कडुन महिलेची आर्थिक फसवणुक

### सायबर पोलिसांत गुन्हा नोंद

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** 'तुज्या आयुष्यात अडचणी आहेत, नातेसंबंध बिघडले आहेत, पूजा-पाठ केला तर सगळं ठीक होईल' अशा शब्दांच्या जाळ्यात अडकवत एका अज्ञात इसमाने महिलेची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार भंडारा जिल्ह्यात उघडकीस आला आहे. सायबर गुन्ह्याच्या अनेक घटना घडत असताना अशाप्रकारे सायबर गुन्हेगारांना बळी न जाण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

दिनांक ५ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत व्हॉट्सअॅप क्रमांकावर स्वतःचे नाव बसीम अली खान (बाबा) असल्याचे सांगून फिर्यादी महिलेशी संपर्क साधला. तिच्या वैयक्तिक आयुष्यातील अडचणी आणि मित्रासोबतच्या नातेसंबंधांवर तोडगा काढण्यासाठी पूजा-पाठ व धार्मिक विधी करण्याचे आमिष दाखवण्यात आले. टप्प्याटप्प्याने पैसे उकळले.

या तथाकथित 'बाबा'ने विश्वास संपादन करत विविध बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने एकूण ४ लाख ३५ हजार २०० रुपये जमा करण्यास फिर्यादी महिलेला प्रवृत्त केले. पूजा पूर्ण झाल्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याने, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने सायबर पोलिसांकडे धाव घेतली.

**अंधश्रद्धा ठरतेय फसवणुकीचे हत्यार..**

सायबर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, सोशल मीडियावर ओळख नसलेल्या व्यक्तींवर विश्वास ठेवू नये. पूजा-पाठ, तंत्र-मंत्र, नातेसंबंध सुधारणा अशा आमिषांना बळी पडू नये. कोणत्याही कारणासाठी ऑनलाईन पैसे पाठवण्यापूर्वी खातरजमा करावी. एक क्षणाचा विश्वास आणि भावनिक कमकुवतपणा कसा मोठ्या आर्थिक फसवणुकीत बदलू शकतो, याचे हे प्रकरण ठळक उदाहरण ठरत आहे.

**सायबर पोलिसांत गुन्हा दाखल**

फिर्यादीच्या लेखी तक्रारीवरून पोलीस स्टेशन सायबर, भंडारा येथे अज्ञात व्यक्तीविरुद्ध कलम ३१८(४) भा.न्या.संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ब) व ६६(क) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक कृष्णकुमार तिवारी करीत असून, संबंधित मोबाईल क्रमांक, बँक खाती व डिजिटल व्यवहारांचा सखोल तपास केला जात आहे.

# सामाजिक न्याय विभागाच्या योजना तळागळापर्यंत पोहोचाव्यात! जिल्हाधिकारी

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** सामाजिक न्याय विभागाव्दारे समाजातील अनेक घटकांसाठी विविध योजना राबवल्या जातात. महीला, विद्यार्थी तसेच जेष्ठ नागरिक यांच्या साठी असलेल्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय व सामाजिक न्याय विभागाच्या वतीने आयोजित मल्टीमीडीया छायाचित्र प्रदर्शनाचा उपयोग होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी व्यक्त केले.



बस स्टॅण्ड परिसरात आयोजित योजना सामाजिक न्यायाच्या या प्रदर्शनाच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते.यावेळी राज्य परिवहन विभागाचे प्रादेशीक व्यवस्थापक श्रीकांत गभणे, विभागीय नियंत्रक तनुजा अहिरकर, आगार व्यवस्थापक सारीका निमजे, जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ दांदळे उपस्थित होत्या.

यावेळी असर फांऊडेशनच्या वतीने योजनांची माहिती देणारी नाटीका प्रस्तुत करण्यात आली. उपस्थित नागरिकांनी यावेळी प्रदर्शनातील माहितीचे अवलोकन केले. दि.२७ व २८ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ दरम्यान हे प्रदर्शन सुरू असुन नागरिकांना ते पाहता येईल.

# पटेल महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**मोहाडी:** नटवरलाल जशभाई पटेल कला वाणिज्य महाविद्यालय मोहाडी येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

प्राचार्य डॉ. सुरेंद्र पवार यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्राच्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये निवड झालेला महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा लक्ष्मीकांत येळणे,महाराष्ट्र सुरक्षा दलात निवड झालेला आकाश दिपटे ,अग्निवीर निखिल जांगडे,आयुष निमजे, राज्यस्तरीय रेड रिबन स्पर्धेत सहभागी वैष्णवी तीरमारे,महाविद्यालयातील उत्कृष्ट विद्यार्थिनी कल्याणी आगाशे,राष्ट्रीयस्तरावर निवड झालेली क्रीडापटू प्राची झेलकर यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयात उत्कृष्ट सेवा देणारे वरिष्ठ लिपिक धर्मराज डोंगरे यांचा सेवानिवृत्ती निमित्त तसेच शिपाई अनिल चकोले यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रा.नरेश आंबिलकर यांनी केले तर आभार प्रा.अनमोल गंधे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.



# विकासाच्या प्रक्रीयेत सर्वांचा सहभाग आवश्यक - ना. संजय सावकारे

### ■ भंडारा पोलीस मैदानात ७७ वा मुख्य प्रजासत्ताक दिन साजरा

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** जिल्हयाचा विकास ही एक सामुहिक प्रक्रीया असुन या प्रक्रीयेत शासन,प्रशासनासोबतच नागरिकांचा ही सहभाग आवश्यक असल्याचे प्रतिपादन वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी आज केले.

पोलीस मैदानात आयोजित ७७ व्या मुख्य प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला ध्वजारोहण केल्यानंतर राष्ट्रगीत व राज्यगीत झाले. मंत्री महोदयांनी पायलट कारमधून परेडचे निरीक्षण केले. त्यानंतर पोलीस, गृहरक्षक दल, श्वानपथक,शालेय विद्यार्थी यांच्यासह विविध पथकांनी मानवंदना दिली. जिल्हा माहिती कार्यालयाच्या शासकीय योजनांची प्रसिध्दी करणा-या चित्ररथाला श्री.सावकारे यांच्या हस्ते हिरवी झेंडी देण्यात आली. यावेळी व्यासपीठावर जिल्हाधिकारी सावनकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी मिलींदकुमार साळवे, पोलीस अधिक्षक नुरूल हसन, उपवनसंरक्षक योगेंद्र सिंह, अतिरीक्त जिल्हाधिकारी राजेंद्रकुमार जाधव , निवासी उपजिल्हाधिकारी मनोहर चव्हाण उपस्थित होते.

जिल्हयातील विविध विकासकामाच्या प्रगतीचा आढावा श्री . सावकारे यांनी भाषणात मांडला. यावेळी जिल्हयातील गृह विभागाच्या कामगिरीचे त्यांनी कौतुक केले.पोलीस अधिक्षक कार्यालयाव्दारे प्रकल्प दिशा या उपक्रमाव्दारे विदयार्थ्यांना एमपीएससी,युपीएससी परिक्षांचे मार्गदर्शन करण्यात येते,या उपक्रमांचे तसेच पोलीस विभागातर्फे कार्यरत सायबर चॅटबोटची देखील त्यांनी प्रशंसा केली.

मत्सव्यवसायाला चालना देण्यासाठी मत्स्यजिरे निर्मितीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगुन मत्सउत्पादन हे या जिल्हयाचे ग्रोथ इंजीन ठरणार असल्याचे ते म्हणाले. २०२४-२५ मध्ये ४६० लक्ष मत्स्यबीज संचयन करून त्यापासून ९५९७



मेट्रीक टन उत्पादन घेण्यात आले असून त्याव्दारे मच्छीमारांना रोजगार तसेच जिल्हयातील नागरिकांना प्रथिनयुक्त सकस आहार उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील विदयार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढविण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती उपयोजना सन २०२४-२५ अंतर्गत नाविण्यापूर्ण योजनेतून अनुसूचीत जाती व नवबौध्द मुलींची शासकीय निवासी शाळा राजेदहेगाव येथील ४० विद्यार्थ्यांनींना विमान प्रवासाव्दारे श्रीहरीकोटा (करफ्द) येथे नेण्यात आले.विद्यार्थीनींच्या वैज्ञानिक आवडीला चालना देण्यासाठीचा हा प्रयोग करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हयातील १०० गावांची जलयुक्त शिवार टप्पा दोन या अभियानात निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये या विभागाकडील ७५ कामे १०७८ लक्ष रुपयांचा समावेश आहे. या योजनेमुळे २१४२.४४ हेक्टर संरक्षीत सिंचनाचा लाभ होणार आहे.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियानाच्या दुस-या टप्पयात ८२ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असुन ३८ कामे प्रगतीपथावर आहेत. तर हर घर जल योजनेंतर्गत जिल्हयातील एकूण २ लाख ५६ हजार ६८४ कुटुंबापैकी २ लाख २५ हजार ७९७ कुटुंबांना कार्यात्मक नळ जोडणी देण्यात आली आहे.अशाप्रकारे जिल्हयातील एकूण कुटुंबापैकी ८७.९७ टक्के कुटुंबाना नळ जोडणी देण्यात आली आहे.तसेच जिल्हयातील एकूण २४६ गावे हर घर जल प्रमाणित करण्यात आली असल्याचे वस्त्रोद्योग मंत्री यांनी सांगितले.

भंडारा जिल्हयातील उमेद अभियांनाव्दारे महिलांना सक्षमीकरण करण्यात येत असून शिखर महिला प्रभाग संघाला ग्रामविकास विभाग , भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय आत्मनिर्भर संघटन प्रथम पुरस्कार १५ ऑगस्ट २०२५ रोजी तेथील पदाधिकारी दिल्ली येथे ग्रामविकास मंत्री भारत सरकार यांच्याव्दारे पुरस्कृत करण्यात आले,ही जिल्हयासाठी अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले.

जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेसाठी उदयोग महत्वाचे असुन मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम २०२५-२६ मध्ये ३२० लाभार्थ्यांना कर्ज मंजुर करण्यात आले आहे.त्यापैकी ८८ लाभार्थ्यांना २२१ लक्ष मार्जिन मनी वाटप करण्यात आले आहे.

जिल्हा गुंतवणुक परिषदेत ४३ सामंजस्य करार करण्यात आले. याव्दारे ४७०.६५ कोटीची गुंतवणुक करण्यात येणार आहे. पैकी ३० सामंजस्य करार कार्यान्वित झाले आहे. त्यांची गुंतवणुक १४४ .७५ कोटी रुपये असल्याचे श्री.सावकारे यांनी सांगितले. भाषणाच्या शेवटी विकास ही एक सामूहिक प्रक्रिया असून त्यासाठी जिल्ह्यातील शासन यंत्रणे सोबतच प्रशासन आणि जिल्ह्यातील नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. आणि भंडारा जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकवर राहण्यासाठी सर्व नागरिकांचे देखील या विकास प्रक्रियेत शासनाला सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमानंतर विविध शाळांना सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

